MHRG190002432025

:: नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०२५ मधील निशाणी क्र.७४ आदेश ::
(अनंत गंगाराम मोरे व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर)

प्रस्तुतचा अर्ज वादीने, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही काम करु नये तसेच सद्यस्थितीत आहे अशी परिस्थिती कायम ठेवावी असा एकतर्फा जैसे थे आदेश पारीत होणेकरिता दाखल केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादीने असे कथन केले आहे की, सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द ठरावाचा, निरंतर व तुर्तातुर्त ताकिदीकरिता दिलेला आहे. प्रतिवादी क्र.३ ठेकेदार असुन प्रतिवादी क्र.४ सब–ठेकेदार आहेत. प्रतिवादी क्र.१ व २ शासन व त्यांचे उपविभागीय अभियंता असुन प्रतिवादी क्र.२ सदर रस्त्याचे कार्यान्वीत यंत्रणा म्हणुन काम पाहत आहेत. दावा मिळकत वादी व इतर प्रतिवादी यांची सामाईक मिळकत असुन वादीचे ताबेकब्जा वहिवाटीस आहे. प्रतिवादी क्र.२ यांनी वादी यांना दावा दाखल केल्यानंतर कामकाज थांबविण्यास सांगितले व रस्त्याचे काम दावा दाखल झालेपासुन बंद होते. परंतु दिनांक १८.०३.२०२५ व दिनांक १९.०३.२०२५ रोजी प्रतिवादी क्र.३ व ४ हे जबरदस्तीने मशिनरी लावुन पुन्हा दावा मिळकतीमध्ये रोडचे काम करणेचे तयारीत आहेत. वादी यांनी दिनांक १८.०३.२०२५ रोजी दावा मिळकतीवर जावुन पाहणी केली असता प्रतिवादी क्र.३ व ४ यांचे कामगार काम करत असल्याचे दिसुन आले. वादी यांनी हरकत घेतली असता कामगारांनी मशिनरी बाहेर काढली मात्र पुन्हा दिनांक १०.०३.२०२५ रोजीपासुन मशिनरीच्या साहाय्याने रोडचे काम करत आहेत. सदरबाबत प्रतिवादी यांना विचारणा केली असता '' आम्ही कोर्ट, पोलीस यांना मानत

नाही, तुम्हाला काय करायचे ते करा'' अशी भाषा वापरुन वादी फोटो काढत असताना अंगावर रोलर मशिन घालणेचा प्रयत्न केला व जिवे ठार मारण्याची धमकी प्रतिवादी क्र.४ यांनी दिली.

०३. वादीचे पुढे असे कथन आहे की, वादीचा जैसे थे परिस्थिती ठेवणेचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादी यांचे काहीएक नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा हेतु साध्य होणार नाही. प्रतिवादी करत असलेले काम हे मंजुर कामाचे work order चे विरुध्द दुस–याच ठिकाणी बेकायदेशीरपणे करीत आहेत. सबब, प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दावा मिळकतीमध्ये कोणतेही काम करु नये तसेच सद्यस्थितीत आहे अशी परिस्थिती कायम ठेवावी असा एकतर्फा जैसे थे आदेश पारीत करणेसाठी विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र.३ आणि ४ यांनी म्हणणे(निशाणी क्र.७६) वर दाखल करुन अर्जास हरकत घेतली. प्रतिवादींचे असे कथन आहे की, त्यांना दिनांक ३०.०१.२०२४ रोजी पोलादपुर–देवपूर–गोळेगणी–कुडपण–कोंढवी–धामणदेवी या रस्त्याची सुधारणा करण्याची वर्कऑर्डर मिळालेली आहे. प्रतिवादी क्र.३ यांच्या वतीने प्रतिवादी क्र.४ सदर कामाची देखरेख व व्यवस्थापन करत आहेत. प्रतिवादीस सदर बांधकाम पुर्ण करणेबाबत बारा महिन्याचे बंधन आहे. प्रतिवादी यांचेविरुध्द कोणतेही मनाई आदेश पारीत केलेले नाहीत. सदर प्रतिवादी यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांचेसोबत केलेल्या करारामध्ये जर ठेकेदाराकडुन काम पुर्ण करण्यास विलंब झाल्यास त्यास दंड ठोठावुन सदर कंत्राटदार त्याचे नाव काळ्या यादीत समाविष्ट करण्याची शक्यता आहे. प्रस्तुत प्रतिवादी यांनी सदर काम करण्यासाठी पगारी मजूर तसेच बांधकाम साहित्य व विविध यंत्रे आणलेली आहेत.

काम पुर्णतः बंद केल्यास सदर बाबींचा नाहक खर्च प्रस्तुत प्रतिवादी यांना सोसावा लागणार आहे.

०५. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, सदर प्रतिवादी हे केवळ अस्तीत्वात असलेल्या रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम करत आहेत. मिळकतीच्या परिस्थितीमध्ये आमुलाग्र बदल वगैरे होईल अशा प्रकारचे कोणतेही बांधकाम प्रस्तुत प्रतिवादी करत नाहीत. वादींच्या वेळकाढु धोरणामुळे केवळ ठेकेदार म्हणुन प्रस्तुत प्रतिवादींचेच नुकसान होत आहे. वास्तविक सदर रस्त्याचे बहुतांश काम पुर्णदेखील झालेले असून केवळ डांबरी कार्पेट टाकण्याचे काम शिल्लक राहिलेले आहे. याकारणास्तव, सदरचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे.

०६. वादी व प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. केस फाईलची पडताळणी केली. वादींचे दाव्यात असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी दिनांक ३०.०१.२०२४ चे वर्क ऑर्डरप्रमाणे देवपुर–गोळेगणी–कुडपण–एमडीआर ७१ ते कोंढवी–धामणदेवी–महालगुर असे रस्त्याची सुधारणा काम मंजुर असताना तसे न करता देवपुर–कोंढवी असा नवीन रस्ता करणेचे काम सुरु केले असुन देवपुर बाजुकडुन काम सुरु करुन वादीचे दावा मिळकतीपासुन १०० मीटर मागे रस्त्याचे काम सुरु होते. दावा मिळकतीमध्ये वादीला कोणतीही सुचना, नोटीस न देता कोणतेही रस्त्याकरिता संपादनाची प्रक्रिया न करता, संमतीखेरीज जेसीबी व मशीन लावुन खोदकाम सुरु केले. दावा मिळकतीमधील साग, आंबा, काजु, बोंडाची व रायवळी झाडे, इत्यादी मशीनव्दारे उखडुन नासधुस केली.

०७. वादी यांनी निशाणी क्र.७८/१ वरील नकाशा, ७८/२ वरील मा.उपविभागीय अधिकारी यांचेकडील दिनांक १३.१०.२०२५ रोजीचे पत्र याचे

अवलोकन केले. तसेच निशाणी क्र.४ वरील सर्व कागदपत्रांची पडताळणी केली. वादींनी दिनांक २८.०२.२०२४ रोजी त्यांचे वकीलांमार्फत प्रतिवादी क्र.४ यांना नोटीस पाठविलेली होती. वादी यांनी त्यांचे वकीलामार्फत दिनांक १८.०९.२०२४ रोजी प्रतिवादी क्र.१ व २ तसेच जिल्हाधिकारी, रायगड यांना तक्रारी अर्ज दिलेले होते. दिनांक २७.०३.२०२५ रोजी वादीचे वकीलांनी प्रतिवादी क्र.१ यास पाठवलेल्या नोटीशीस दिनांक ०२.०४.२०२५ रोजी उत्तर दिल्याचे वादीने दाव्यासोबत दाखल कागदपत्रांवरुन दिसुन येत आहे परंतु दाव्यात प्रस्तुतची दिनांक २७.०३.२०२५ रोजीची नोटीस जोडलेली नाही. तसेच वादातीत रस्त्याचे बांधकाम दावा मिळकतीत अतिक्रमण करुन होत आहे असे दर्शविणारा कागदोपत्री पुरावा वादींनी याकामी दाखल केलेला नाही. याकामी दाखल फोटो वादातीत रस्त्याचेच आहेत असे दर्शविणारा सबळ पुरावादेखील वादींनी दाखल केलेला नाही. सदर दाव्याचा निकाल हा गुणानुगुणावर लागणार आहे. वादी व प्रतिवादी आपापला पुरावा सादर करतील. एकुणच, वादी प्रथमदर्शनी केस असल्याचे पटवून देण्यास असमर्थ ठरले आहेत. सदरचा अर्ज मंजूर केला तर प्रतिवादींवर अन्यायकारक होईल. सदरची बाब लक्षात घेता सदरचा अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होईल. मी याकामी प्रतिवादींतर्फे करण्यात आलेला युक्तीवाद ग्राहय धरला आहे. वर चर्चिलेल्या बाबींच्या अनुषंगाने खालील आदेश करण्यात येतो.

## :: आदेश ::

१) अर्ज (निशाणी क्र.७४) नामंजूर करण्यात येतो.

२) अर्जाचा खर्च दाव्यात समाविष्ट करण्यात यावा.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.04.04 12:07:55 +0530

**(श्रीमती एच. आर. जाधव)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, महाड

महाड
दिनांक ०४.०४.२०२६

दिनांक ०४.०४.२०२६